1

# हिराबाई जाफरमियाँ

१.

हिराबाई सापडलीस तू जाफरमियाँला
तुळजापूरच्या भवानी मंडपात
जाफरमियाँ होता भटकत
आपल्या हिंदू मित्रांसमवेत करीत तीर्थयात्रा
मित्रांना सोडून देऊन तुझ्यासाठी
काही काळ थांबला तिथं
आणि आला घेऊन तुला
त्याची पाच लेकरं सांभाळण्यासाठी
लजपतवाडीला

जाफरमियाँची बायको नव्हती जगात
अनाथ ननग्या लेकरांची
तू अचानक झाली पाचांची माय
आफरीन, आमरीन, अरमान इसहाक
आणि धाकला दूधपिता लालमहंमद
खजुराच्या झाडाला नारळ लटकवावं
तशी तू झालीस हिराबाई जाफरमियाँची बिवी

२.

रितसर झालीस तू मुसलमानीन
अर्ध्या उमरीत आणि पढू लागली कलमा
आलिफ बे...

खोकत खोकत रोज म्हातारा मौलवी यायचा
तुला कुराण शिकविण्यासाठी
तुझी तालीम नि माझी शाळा
एकाच वेळी होती चालू

दोघं बसायचो पाटी घेऊन अंगणात
आणि तू पढायचीस कलमा
तुझ्या अदाकारीनं अन विचारायचीस,
'जमला का संतोस कलमा मला ?'

मी हो म्हणायचो नकळून
आणि मी घोकून दाखवायचो तुला

'मला आवडते वाट वळणाची'
आणि तू ढसकन रडायची काहितरी जुने आठवून

३.

तुझ्या त्या पाचांची
म्हणे शिक्षणं, नवकरीपाणी,
त्यांना रांकला लावून
तू लावल्यास त्यांच्या शाद्या
आणि पाची गेल्ते देशोधडी
तुम्हा दोघांना सोडून
लिंपणातून माती निसटून पडावी
भिताडीचा पोपडा वारंवार गळून पडावा
तशी तू झाली होतीस जाफरमियाँच्या घरात

जाफरमियाँ दमेकरी खोकल्यानं
जाम व्हायचा नि तुझा चेहरा
घाबराघुबरा  होऊन जायचा
तू बुढयासाठी धावायची दवापाणी आणायला

पाचानी बापमाय खाटल्यावर जाय
तुझा कळवळायचा जीव
नि सांगितलीस कहाणी एक दिशी
तू तूझी जाफरमियाँच्या आयुष्याची

४.

जाफरमियाँ लजपतवाडीचा जहागिरदार
नि एवढया तेवढया झगडयावरून
जोरूच्या भावांशीच तंटला चाकू सुन्या निघाल्या
'सब दुनिया एक तरफ जोरूके भाई उस तरफ
रामनवमीच्या यात्रेहून परत आलेला
जाफरमियाँ नि त्याची बिवी वैदा
झोपलेते पाच लेकरांना मधोमध घेऊन
अंगणात पांघरूण ओढून
नि जाफरमियाँ समजून
ध्याराती चालल्या तलवारी
जोरूच्या भाईंच्या
पांघरूण घेतलेल्या अंगावर
आंधळयासारख्या

पण जागा चुकली होती
नि सख्खी बहीणच
तलवारीच्या पात्याखाली आली होती

कोणीच नाही आलं
समजूतीला जातजमातीचं
नि जाफरमियाँला सापडला
आसरा हिराबाईचा
गेली भरपूर सालं नि
पूर वसरलेल्या काडी कचऱ्यागत
उरली हिराबाई नि जाफरमियाँ

तोही झाला एक दिस पैगंबरवासी
नि तुला ज्या मौलवीनी दिल्ली इस्लामची
शपथ तोही नाही राहिला जगती

आता तू पुन्हा
तुळजापूरच्या भवानीसमोर
सौभाग्याचं कुंकू हिरवे चुडे विकीत बसलेली
तुझी एकच विचारणा होती मला
अख्खी वीस वर्षांनी भेटल्यावर

'संतोसभाऊ,
मला मेल्यावर लोक
जाळतील का पुरतील रे ?
माझं नाव नोंदून बघना
तुझ्या गावच्या कबरस्तानात
नि सांग असासं झाल्तं म्हणून..

2

छ बू

संतोष पद्माकर पवार
१
छबू यायचीस तू दुकानी
तुझी पोलकी शिवून घ्यायला
नि तुझ्यामुळे

तुझ्या जोडीदारनीदेखील
पण त्यासार्या गर्दीत तुच होती ध्यानात
राहणारी
सार्याच होत्या सुंदर सुस्वरूप
पण तुझे मनच होते निर्मळ खूप
तू होतीस सावळी
देवीच्या वणांनी चेहरा भरलेला
पण तोंडात मिठ्ठास तशीच मायाळू
वागणुकीला
तमाशातल्या फडातली सहनर्तिका
पण आता
हौसा-मंजुळाचा फड मोडल्यापास्नं
घरीच राहिलेली
तू राहायची त्या खोलीचं भाडं थकलतं
जुन्या चंदीवर थोडंबहुत चाल्लतं
२
तुला यायच्या नाचाच्या नवनव्या स्टेप्स
नव्या पोरींना शिकवायची
नायकिणीच्या गैरहजेरीत
तुला नाही मिळाली कधी पूर्ण
संधी
तू सहनर्तिकाच
तरीही रंगबाजी लावणीत
पुढच्या मुली
चुकू लागल्या की तू चुचकरायाची
मन थार्यावर नसलेली एखादी
नुसतेच हातवारे करीत राह्यची
तू ध्यानी आणून द्यायची
होऊ नाही द्यायची गाण्याचा इस्कोट
बांधित राह्यची गाण्याची मोट
तमाशा चालू होता तेव्हा खेळ संपल्यावर
तमाशा प्याक होऊन गाडीत पडेपर्यंत
तुझी राह्यची नजर
खाली काही राहिलं
नाही ना यावर
तुझा विरोध होता चिरा उतरविण्याच्या प्रथांना
तू हुसकलेस कनातीत भटकणारे भातू
तुझा विरोध खासगी बैठक लावण्याला
नि कुणी चवलीपावलीचे
व्हायला

वाजापापासून कनात बांधनार्यापर्यंत
चालायचा तुझा शब्द
जत्रा-खेत्राच्या दिवसात तू जायची
दोन-दोन महिने दौर्यावर
३
तुला नव्हता मिळाला मनाजोगता जोडीदार
एकट्याच
मैनंसारखी राह्यची त्या पत्र्यात
एक मांजर होतं रोज अर्धालिटर दूध पिणारं
नि शेवटी एक भालू कुत्रा जो खायचा
दिवसात तीन भाकरी
स्वतःच्या पोटाला चिमटा काढून त्यांना खिलवण्याचा
अनजाना प्रयोग पाहून थक्क व्हायचे लोक
दर दिवाळी राखी पौर्णिमेला तू
सुटायची
ओवाळीत सार्या शेजारपाजारच्यांना
तुला राह्यचं होतं तिथं खोलीत एकटीनं
जोडायचं होतं नातं जगाशी
आपल्या का बाजूने होईना
छ बू
दोनच अ क्ष रं तुझ्या नावाची माहीत
बाकी कधी काही कळलं
नाही
मराठवाड्यात तिकडं बीडाकडं
कुठं कोपर्यात होतं तुझं गाव
४
तुला रेडिओची लय आवड
पण
तुला घेता आला नाही कधी जिंदगीत
तू ऐकायची कान देऊन जिथं असंल रेडू
सिंध्याच्या बेकरीत रेडू वाजू लागला की
छबू,तू हरवून जायची
दोनशे रुपयात टुइन, टेपरेकॉर्डसहीत रेडिओ
तुला इकलाता एका लफंग्यानं
जो खूपच स्वस्त होता नव्याच्या मानानं
तो चोरीचा निघाला नि तू अडकली गुन्ह्यात
मोप छळ केला पोलिसांनी
सात वर्षे चालुती केस त्या टुइनची
शेवटी निर्दोष ठरली
परत तू ऐकला ना कधी रेडू

थेटरचा सिन्मा पाह्यची अधूनमधून
तोही बंद झाला तुझा
५
एकदा हाती घेऊन
पहिलीती
तुझी पैंजण जोडी
जणू मी उचलत होतो राशनच्या थैल्या
'केव्हढी ग ही जड
तू म्हणाली होतीस...
'आमचं पोट आमच्या घोट्यावर बांधलेलं असतं
आमच्या हमालीची कोणाला कलपना नसती
घुंगरू नाही भाऊ आमची भूक तिथं वाजत
असती...
तुझे जुने साथीदार
हलगी,ढोलकी वाजाप
यायचे डुलतडुलत
जर्मली पातिल्यात बिनदूधाचा 'च्या'
उकळून लावायची वाटी
म्हणायची,
'आपल्या आयुष्याला कोणतीच
रंगत नाही आली दादा...
तमाशाची कलाकेंद्र त्याचीच पुढं
धंद्याची जागा झाली
बोर्डावरची बाई पांघरुणात आली
याच्यात कशाची कला राह्यली ?
तुझा जातधंदा गायचा-नाचायचा
त्याची बरकत
शहरवस्तीच्या लोकांना गेली
नऊवारीतली कला मुर्दाड?
नि दंड-
बेबी उघडी सोडणारांची आवक
झाली
म्हणे छबू तू करते ती कलेची घाण
त्यांच्या गाण्याची 'पद्मश्री'
झाली...
६
खोली मालकानं बाहेर फेकलं
तू ओक्साबोक्शी रडली
तुझं बिरहाड बाजलं देतच नव्हता आधी
कसंबसं ते मिळालं

नि तुला कधीच बघायचं नव्हतं…
त्या कलाकेंद्राचं दार तुला शेवटी बघावं लागलं
७
एका रात्री उशिरा कलाकेंद्रावर
झाला आरोड
छावणीतून आलेल्या जवानांनी
पोरी उचलून गाडीत घालून
न्यायची केल्ती तयारी
तव्हा तुझ्या हाती आला खाटकी सुरा
नि बळही आलं कुठून
वाचवलं पोरींना
झटापटीत तू पाडलेस तीन जवानांचे मुडदे
सुरा घेऊन जाऊन बसली पोलिस ठाण्यात
तव्हा तुझ्या चोरीच्या आरोपातल्या रेडिओवर
पोलिसपार्टी ऐकत होती लता मंगेशकरचं
गाणं…
'ऐ मेरे वतनके लोगो
जरा ऑखमें भर लो पानी
जो शहीद हुवे हैं उनकी जरा याद
करो कुर्बानी …
छबू ,
ज्या गाण्याचे भल्तेच अर्थ निघत होते त्यावेळी

3-
शेणच आहे इथल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर

सृष्टी आधी शेण होते सृष्टीनंतर शेण आहे
ज्याच्या हाती शेण नव्हते असा कोण आहे
शेण होते म्हणून सारवले महाकाव्याचे पान...
शेण होते म्हणून झाले रामकृष्ण हनुमान
शेण होते टिळकांआधी शेण उरले टिळकांनंतर
शेणच आहे इथल्या हलकट शिंच्याचे उत्तर
सावरकरात शेण होते तेच आले गोडशाहाती
गोडशाने झाडले शेण महात्मा होऊन पडले शेण
शेण आहे सत्ता सारी खुर्चीत बसले सारे पोह
पोवालाच मते आणि शेण रंडकीचे घोव
शेणाचेच गायवाडे आता तेच तुझे अधिपती
कृष्ण तृणाखाली निजले शेण प्रजापती
शेण अखेर तुझे माझे शेणाला नाकारू नको

शेण मात्र येते कोठून धर्मग्रंथास पुसू नको
शेण आहे तुझ्या एकूण जगण्याचा बंदोबस्त
शेणानेच लिंपून घे तुझा मेंदू दरोबस्त
खात्री धर अण्वस्त्राला पुरून उरते शेण
सारवले की विमानही नजरेआड होते अवघे
पृथ्वी सारी जळून जाईल शेणच उरेल मागे शेवटी
माणसाने लावून घ्यावी आता शेणाचीच शेपटी
शेण खाऊ घरोघर आणि शेणच होऊ खरोखर
शेणच आहे आता साऱ्या सृष्टीचे तत्त्वसार
शेणच आहे या परंपरेचे आहे बापरखमादेव
शेणच आहे आपल्या अभ्युदयाची आशा एकमेव

4
खरडकाम-खोदकाम चालूहे

गावातल्या जुन्या भिंती
मी स्वच्छ करू लागलोहे
मला तेच एक काम मिळालेहे
भिंतीवर चित्रहेत म्हणता अगणित

मी पुसू लागलोहे आजपासून
तर काळाचा एकेक पापुद्रा येऊ लागलाहे
हाताखाली
मी पंजा खरडून जाईस्तोर
काढली भिंत खरडून
तर खाली गाय-वासरू मिळालीहे
त्यांना मी एक चारा पेंढी दिली
नि ती जोडी
गो-शाळेत चालती झालीहे
किलोवर शेण आणि लिटरवर
गोमूत्र विकले जातेहे
त्यांचे महिमा, व्रत अंगिकारले जातेहे
संस्कृती तरली जातेहे

त्याखाली आलाहे
एक नांगरधारी शेतकरी
मी त्याला त्याची जमीन विचारलीहे
काहीच गावणार नाही तरी तो
पवनारकडे चालत गेलाहे

मग सापडलाहे एक मरून पडलेला हत्ती

काळाकोळ हडकुळा
त्याचे धूड एका तलावात पडलेलेहे
त्याचे पाय बहुधा मग्रीने खाल्लेलेहे
त्याच्या सोंडेत म्हणे एक कमळही होते
जो त्या सुतर्फेणी म्हातार्‍याला
ब्रह्म समजून अर्पण करताना मेला म्हणतातहे

पुढे सापडली एक पणती
जिच्यात तेल आणि वात होती शाबूत
आणि ती अग्नीच्या शोधातहे
मी आणखी भिंत घासताच
ठिणग्या बाहेर पडू लागल्याहे
ती आता दारूगोळयासारखी
धुमसू लागलीहे
कमलदल मिटताहे दलदल वाढलीहे
भिंत अवघी देश नकाशासारखी झालीहे
माझ्या हाती खरवडून खरवडून
रक्ताची नदी लागलीहे
तिच्या उगमाशी त्यांनी श्रद्धेने फुल वाहिलेहे
गोष्ट भिंतीचीच होती
अजून इथली माती कोणी उकरलीहे ?
एक सत्याची हाक तिथे म्हणे पेरलीहे

एका अजस्त्र लोटानंतर
इथेही चिखलच साठणाराहे
इथेही चिन्हांचे खेळ
पुन्हा गाडले जाणाराहे
इथेही त्या दाढीधारी
माणसाचे पुन्हा शिल्प मिळणाराहे

5
अंधारयुग

बिनादरवाजा-बिनाखिडकीची अंधारकोठडीची गाडी अंधारभुडकीची
सूटणार आहे कधी? वेळ काय आहे गाडीची त्या भोकाडीची
तिथे कोंबलेले आहेत कोण कोण कोण?
कोण्या देशी जाऊन थांबेन म्हणून आमेन?
अंधाराच्या गाडीला अंधाराचे हेडलाईट
अंधाराचा धूर अंधार्‍या रातीला
अंधाराचा कोळसा अंधार्‍या इंजिनाला

अंधाराचे चालक अंधाराच्या रुळाला
अंधाराचे सिग्नल अंधाऱ्या स्टेशनला
आंधळे चौकीदार अंधाऱ्या चौकीला
लोखंडाची चाके घासताहे घासताहे
ठिणग्या तिथेच उडताहे उडताहे
एवढाच प्रकाशहे तिथेच एकमेव आशाहे

6

**गांधीला टाळून**
गांधीला टाळून मला भारत म्हणता येत नाही
गांधीला वगळून मी आफ्रिका म्हणू शकत नाही
पोरबंदरची दिवादांडी गांधींच्या निरोपाची
मी पुतळा बाईच्या संस्काराला कमी लेखू शकत नाही

मी गांधींशिवाय
सत्याग्रह आणि स्वातंत्र्याची व्याख्या लिहू शकत नाही
मला एकव्याने मार्टिन ल्युथरकडे
आणि पुढे नेल्सन मंडेलाकडेही सरकता येत नाही

मला गांधींचे नाव घेऊन पाकिस्तानात जाता येत नाही
आणि भारतातही राहता येत नाहीय

मला गांधींच्या चष्मा चोरीचा नाही
त्यांच्या हरवलेल्या दृष्टीचा तपास आहे
गांधींचे घडयाळ कुणी चोरले मला त्यात रस नाही
गांधींची वेळ या देशात कुठे हरवली, मी शोधतोय
मला गांधींच्या नोटेवर असण्याचे कौतुक नाही
ते चलनात नसल्याचा खेद आहे

इव्हन गांधीला कोणी कसे का मारले याचेही घेणे नाही
मला त्या मारेकऱ्याची बंदूक अद्याप जिवंत असल्याचे दुःख मात्र आहे

